# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ५६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर, २०१३ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ५६ वी बैठक मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर, २०१३ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका (उ. शि.), सोलापूर विभाग | सदस्या |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १०) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| ११) | श्री. रोकडे एम. एस. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १२) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

प्रा. डॉ. पाटील टी. आर., डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर., श्री. गायकवाड बी. आर. व सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी दूरध्वनीद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. याशिवाय अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी, प्राचार्य श्री. पवार एस. के. हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.३० ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ५५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** दि.३० ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ५५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] कार्यालयीन कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरात शासनाने केलेल्या सुधारणाबाबतचा प्रस्ताव विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.प्रवास-१०१३ / प्र.क्र.३ / सेवा-५, दि.०२ मे, २०१३ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय / कार्यालयीन कामकाजास्तव दौऱ्यावर असताना दिल्ली, मुंबई, कोलकता, चेन्नई, बंगळुर व हैद्राबाद शहरातील अनुसुचित दर आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरात सोबत जोडलेल्या शासन निर्णयानुसार सुधारणा करण्यात आली आहे. सोबत शासन निर्णय अवलोकनार्थ जोडला आहे.

सबब, शासनाने कार्यालयीन कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरात केलेली सुधारणा विद्यापीठास लागू करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : कार्यालयीन कामकाजास्तव दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळूर व हैद्राबाद या शहरातील हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरात शासनाने सुधारणा केलेल्या शासन निर्णयाची नोंद घेवून त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांचे करिता शै.वर्ष २०१४-१५ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: शै.वर्ष २०१४-१५ करीता सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करण्यासाठी सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलांचे संचालक व मा.परीक्षा नियंत्रक यांची बैठक विद्यापीठात दि.१५/१०/२०१३ रोजी आयोजित केली होती. सदरच्या बैठकीमध्ये शै.वर्ष २०१४-१५ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या आहेत.

| विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | १६ जून, २०१४ | १८ ऑक्टोबर, २०१४ | १३ नोव्हेंबर, २०१४ | १ मे, २०१५ |
| अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम.बी.ए., एम.एस.डब्ल्यु, विधी इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | १ जुलै, २०१४ | २९ नोव्हेंबर, २०१४ | १ जानेवारी, २०१५ | २३ मे, २०१५ |
| शिक्षणशास्त्र (बी.एड. बी.पीएड, एम.एड, एम.पीएड, एम.ए. एज्युकेशन इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | १ जुलै, २०१४ | २९ नोव्हेंबर, २०१४ | २३ डिसेंबर, २०१४ | १४ मे, २०१५ |

**टीप: सत्रारंभ व सत्रसमाप्तीच्या तारखांमध्ये महाविद्यालयास बदल करता येणार नाही.**

**सत्रारंभाच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी सत्रारंभास सुरुवात करावी. सत्र समाप्तीच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या अगोदरचा दिवस सत्र समाप्तीचा दिवस राहील.**

सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना प्रथम विद्या परिषदेसमोर सादर करुन मान्यता घेणे व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेसमोर सदरच्या तारखा मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे, व तद्नंतर सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुल यांना कळवावे लागणार आहे.

त्याअनुषंगाने शै.वर्ष २०१४-१५ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा मान्यतेस्तव दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केल्या असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१४८ अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांच्या करिता शै.वर्ष २०१४-१५ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांस विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव : **संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांचे करिता शै.वर्ष २०१४-१५ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] न्यु सातारा समुह मुंबई संचलित, न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः मा.सचिव, न्यु सातारा समुह, मुंबई यांनी संस्था संचलित न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर महाविद्यालय शै.वर्ष २०१०-११ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु आहे. सदर महाविद्यालयात शै.वर्ष २०१०-११ मध्ये केवळ ०१ विद्यार्थी प्रवेशित झाला होता. शै.वर्ष २०११-१२ मध्ये केवळ ०३ विद्यार्थी प्रवेशित झाले होते व शै.वर्ष २०१२-१३ मध्ये एम.बी.ए. भाग २ साठी ०१ विद्यार्थी प्रवेशित होता. या मागील शै.वर्षाचा आढावा पाहता अत्यल्प मिळणारा विद्यार्थी प्रतिसाद व त्यांना आतापर्यंत उपलब्ध दृष्ट्या महाविद्यालय चालविणे संस्थेस शक्य नसल्याने सर्वविचारांती हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याचा निर्णय संस्थेने घेतला असल्याचे सदर प्रस्तावात नमूद करुन महाविद्यालय बंद करण्याबाबत रितसर शुल्कासह प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये महाविद्यालय / विद्याशाखा / विषय / अभ्यासक्रम व अतिरीक्त तुकडी बंद करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्या परिषदेस उपरोक्त प्रमाणे अधिकार दिलेले आहेत. उपरोक्त तरतूद अवलोकनी घेवून महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास्तव महाविद्यालयास भेट देवून अहवाल प्राप्त करण्यास्तव विद्यापरिषदेकडून स्थानिक चौकशी समिती नियुक्त करणे आवश्यक होते. तथापि, दरम्यानच्या काळात विद्यापरिषदेची बैठक आयोजित होणार नसल्याने विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी सदर महाविद्यालयास प्रत्यक्षात भेट देवून अहवाल सादर करण्यास्तव म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. डॉ. ए. ए. शेख (अध्यक्ष)**
**२. डॉ. आर. एस. हेगडी (सदस्य)**
**३. श्री. एम. एल. अडवाणी (सदस्य)**

सदर समिती सदस्यांनी महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून सदर अहवालात समितीने न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याविषयी शिफारस केलेली आहे. ए.आय.सी.टी.ई.

यांचे नियमावलीनुसार न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर हे महाविद्यालय बंद करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तुत विद्यापीठाचे ए.आय.सी.टी.ई. यांचे विहीत नमुन्यात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे लागणार आहे. त्यास्तव सदर महाविद्यालय बंद करण्यास विद्यापरिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यास्तव, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१२५ अन्वये सदर महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

समितीने सादर केलेला अहवाल पाहता, सदर महाविद्यालयात खालीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेशित असल्याचे दिसून येते.

| शै. वर्ष | प्रवेशित विद्यार्थी |
|---|---|
| २०१०-११ | ०१ |
| २०११-१२ | ०३ |

परंतु महाविद्यालयाकडे दूरध्वनीद्वारे चौकशी केली असता सद्यस्थितीत शै.वर्ष २०१३-१४ मध्ये एकही विद्यार्थी प्रवेशित नसल्याचे समजते.

सबब, न्यु सातारा समुह, मुंबई संचलित न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता.पंढरपूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव :** **न्यु सातारा समुह मुंबई संचलित, न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] मा.ना.दिलीपरावजी सोपल शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे संचलित श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी, ता.बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी:- मा.संस्था अध्यक्ष, मा.ना. दिलीपरावजी सोपल शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांच्याकडून खालीलप्रमाणे संस्थेचे संचलित श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी हे महाविद्यालय बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

| संस्थेचे नांव | जे महाविद्यालय बंद करावयाचे आहे त्या महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| मा.ना. दिलीपरावजी सोपल शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी. ता.बार्शी, जि.सोलापूर. | श्रीमान योगेश सोपल कॉलेज पांगरी, ता.बार्शी, जि.सोलापूर | शै.वर्ष २०१३-१४ पासून | बी.ए. | कायम विनाअनुदानित |

उक्त संस्थेच्या संचलित श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने शै.वर्ष २००१-०२ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिलेली होती. परंतु महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रमास आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्यामुळे संस्थेने सदर महाविद्यालय बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे कळविले आहे.

उपरोक्तप्रमाणे संस्थेकडून संचलित महाविद्यालय बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. डॉ. एन.बी. पवार (अध्यक्ष)
२. डॉ. एस.डी. कदम (सदस्य)
३. डॉ. एस.डी. शिंदे (सदस्य)

सदर समितीने श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी या महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने सदर महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी, ता.बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याची बाब दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१२७ अन्वये सदर महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

समितीने सादर केलेला अहवाल पाहता, सद्यस्थितीत (शै.वर्ष २०१२-१३ मध्ये) सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | बी.ए. भाग १ | १२० | निरंक |
| २ | बी.ए. भाग २ | १२० | निरंक |
| ३ | बी.ए. भाग ३ | १२० | १६ |

सबब, मा.ना. दिलीपरावजी सोपल शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे संचलित श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी. ता.बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत

**ठराव : मा.ना.दिलीपरावजी सोपल शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे श्रीमान योगेश सोपल कॉलेज, पांगरी, ता.बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून शासनास तशी शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः मा.प्राचार्य, सांगोला महाविद्यालय, सांगोला यांचेकडून महाविद्यालयातील बी.बी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| **सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळ, सांगोला, ता.सांगोला, ज.सोलापूर** | **सांगोला महाविद्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर** | **शै.वर्ष २०१४-१५ पासून** | **बी.बी.ए.** | **कायम विनाअनुदानित** |

उक्त संस्थेच्या संचलित सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी.बी.ए. अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने शै.वर्ष २००९-१० पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेली होती. परंतु महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रमास आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे कळविले आहे.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाकडून बी.बी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. डॉ. ए.ए. शेख (अध्यक्ष)**
**२. श्री. पी.एम. दर्गोपाटील (सदस्य)**
**३. श्री. आर.एस. मेंते (सदस्य)**

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून महाविद्यालयातील बी.बी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी.बी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची बाब दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१३३ अन्वये सदर महाविद्यालयातील बी.बी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव : **सांगोला महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयातील बी.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून तशी शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः मा.सचिव, प्रज्ञा एज्युकेशन सोसायटी, पुणे यांनी संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर महाविद्यालयात सुरु असलेला एम. बी. ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर महाविद्यालयात शै.वर्ष २००९-१० पासून एम.बी.ए. हा अभ्यासक्रम सुरु आहे. तथापि, मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा विद्यार्थ्यांची प्रवेशित संख्या कमी झाल्याने सदर कोर्स चालविणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होत नसल्याचे कळवून महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत रितसर शुल्कासह प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये महाविद्यालय / विद्याशाखा / विषय / अभ्यासक्रम व अतिरीक्त तुकडी बंद करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्या परिषदेस उपरोक्त प्रमाणे अधिकार दिलेले आहेत. उपरोक्त तरतूद अवलोकनी घेवून महाविद्यालय सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास्तव महाविद्यालयास भेट देवून अहवाल प्राप्त करण्यास्तव विद्या परिषदेकडून स्थानिक चौकशी समिती नियुक्त करणे आवश्यक होते. तथापि, दरम्यानच्या काळात विद्या परिषदेची बैठक आयोजित होणार नसल्याने विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी सदर महाविद्यालयास प्रत्यक्षात भेट देवून अहवाल सादर करण्यास्तव म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. डॉ. ए. ए. शेख (अध्यक्ष)**
**२. डॉ. आर. एस. हेगडी (सदस्य)**
**३. श्री. एम. एल. अडवाणी (सदस्य)**

सदर समिती सदस्यांनी महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून सदर अहवालात उक्त महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे. ए.आय.सी.टी.ई. यांचे नियमावलीनुसार महाविद्यालयास एम.बी.ए. हा अभ्यासक्रम बंद करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तुत विद्यापीठाचे ए.आय.सी.टी.ई. यांचे विहीत नमुन्यात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे लागणार आहे. व तद्नंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास ए.आय.सी.टी.ई. व महाराष्ट्र शासन यांची मान्यता प्राप्त झालेनंतर टप्प्याटप्प्याने सदर अभ्यासक्रम बंद करण्यास पुनःश्च विद्यापरिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यास्तव, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१२६ अन्वये सदर महाविद्यालयातील एम.बी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

समितीने सादर केलेला अहवाल पाहता, सद्य:स्थितीत (शै.वर्ष २०१३-१४ मध्ये) सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | एम. बी. ए. भाग १ | ६० | ०० |
| २ | एम. बी. ए. भाग २ | ६० | ३९ |

सबब, नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव : **प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे संचलित सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः मा. अध्यक्ष, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांच्याकडून खालीलप्रमाणे संस्थेचे संचलित सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी हे महाविद्यालय बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

| संस्थेचे नांव | जे महाविद्यालय बंद करावयाचे आहे त्या महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, ता.बार्शी, ज.सोलापूर. | सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर | शै.वर्ष २०१३-१४ पासून | बी.ए. | कायम विनाअनुदानित |

उक्त संस्थेच्या संचलित सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने शै.वर्ष २००१-०२ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिलेली होती. परंतु शै.वर्ष २०१२-१३ मध्ये एकही विद्यार्थी विद्यार्थी प्रवेशित झाला नसून पूर्वीच्या विद्यार्थ्यांनीही स्वतःचे दाखले मागणी करुन घेवून त्यांनी इतर महाविद्यालयात प्रवेश घेतला असल्याने संस्थेने सदर महाविद्यालय बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे कळविले आहे.

उपरोक्तप्रमाणे संस्थेकडून संचलित महाविद्यालय बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. डॉ. एन.बी. पवार (अध्यक्ष)
२. डॉ. एस.डी. कदम (सदस्य)
३. डॉ. एस.डी. शिंदे (सदस्य)

सदर समितीने सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने सदर महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याची बाब दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१२९ अन्वये सदर महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

समितीने सादर केलेला अहवाल पाहता, सद्यस्थितीत (शै.वर्ष २०१२-१३ मध्ये) सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | बी.ए. भाग १ | १२० | निरंक |
| २ | बी.ए. भाग २ | १२० | निरंक |
| ३ | बी.ए. भाग ३ | १२० | ०४ |

परंतु महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता चालु शै.वर्ष २०१३-१४ मध्ये एकही विद्यार्थी प्रवेशित नसल्याचे समजते.

सबब, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे संचलित सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली

ठराव : **यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित सोजर कला-वाणिज्य महाविद्यालय, बार्शी हे महाविद्यालय शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून तशी शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुला अंतर्गत एम. बी. ए. अभ्यासक्रम सुरु असून पी. जी. प्रवेश विभागाने सदर अभ्यासक्रम बंद करण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविलेले असून सदर अभ्यासक्रमाची माहिती खालील प्रमाणे आहे.

१. एम.बी.ए अभ्यासक्रमासाठी शासनाची सन २००५-०६ मध्ये मान्यता प्राप्त झालेली होती तथापि, सदर अभ्यासक्रम प्रत्यक्षात शै.वर्ष २०११-१२ मध्ये सुरु झालेला आहे. प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन सदर अभ्यासक्रमास सुरुवातीस ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त झालेली नाही तथापि सन २०१२-१३ मध्ये ए.आय.सी.टी.ई यांचे पोर्ट्रल वरुन घेतलेल्या स्क्रिन शॅाट मध्ये एम.बी.ए अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ३० वरुन ६० अशी करण्यास ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेली आहे.
२. सद्य:स्थितीत एम.बी.ए या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ६० इतकी आहे.
३. सदर अभ्यासक्रमास तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या प्रवेश प्रक्रियेमार्फत शै.वर्ष २०१३-१४ मध्ये एम.बी.ए भाग १ मध्ये दोन विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. प्रवेशित दोन विद्यार्थ्यांच्या फि मध्ये एम.बी.ए हा अभ्यासक्रम चालविणे शक्य नसल्याने विद्यापीठाने प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांना विद्यापीठ स्तरावर परीक्षा घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली होती.
४. त्यास अनुसरुन प्रवेश नियंत्रण समितीने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांना स्वतंत्रपणे प्रवेश परीक्षा घेता येणार नाही असे कळविले आहे.
५. त्यास्तव दोन विद्यार्थ्यांचा प्रवेश रदद् करुन इतर महाविद्यालयाकडे वर्ग करण्यास मा.कुलगरु महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.
६. सदर मान्यतेनुसार या दोन्ही विद्यार्थ्यांनी इतर महाविद्यालयात प्रवेश घेतल्याने चालू शैक्षणिक वर्षामध्ये भाग १ मध्ये विद्यार्थी संख्या निरंक असल्याने सदर अभ्यासक्रमातील भाग १ बंद आहे.
७. एम.बी.ए भाग २ या वर्गात एकूण १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याने भाग २ चे वर्ग सुरु आहेत.
८. सदर अभ्यासक्रम अनुदानित तत्वावर मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे मागणी करण्यात आली आहे.
९. सद्य:स्थितीत एम.बी.ए हा अभ्यासक्रम आर्थिकदृष्टया चालविणे शक्य नाही
१०. अभ्यासक्रम बंद करावयाचा असल्यास सदर अभ्यासक्रम बंद करण्याची बाब विद्या परिषद समोर व तद्नंतर विद्या परिषदेच्या शिफारसीनुसार व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करुन त्यांचे मान्यतेअंती सदरबाब संबंधित प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक आहे.
११. संबंधित प्राधिकारणाची मान्यता प्राप्त झालेनंतर एम.बी.ए हा अभ्यासक्रम कायम स्वरुपी बंद होईल.

उक्त बाबींस अनुसरुन, विद्यापीठात सुरु असलेला एम.बी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याची बाब दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.१२८ अन्वये विद्यापीठात सुरु असलेला एम.बी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, विद्यापीठात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठात सुरु असलेला एम. बी. ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ]** **नवव्या दीक्षांत समारंभात मार्च / एप्रिल, २०१३ अखेर आयोजित विद्यापीठीय विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र स्नातकांना विद्यावाचस्पती, पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ अंतर्गत कलम ७१ अन्वये मार्च / एप्रिल, २०१३ अखेर आयोजित विद्यापीठीय विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र स्नातकांना पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत व ऑक्टोबर, २०१३ अखेर उत्तीर्ण पात्र स्नातकांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा कलम ९६(१) व २८ (n) नुसार पदव्या , पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

Maharashtra Universities Act 96(1);

The Management Council may institute and confer such degrees, diplomas, certificates and other academic distinctions as may be recommended by the Academic Council.

Maharashtra Universities Act 28 (n);

Institute and confer such degrees, diplomas, certificates and other academic distinactions as recommended by the Academic Council and arrange for convocation for conferment of the same, as provided by the Ordinances;

त्यानुसार, दि.०७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या झालेल्या बैठकीत ठराव क्र.१५५ अन्वये, विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस सदरची शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव :** **नवव्या दीक्षांत समारंभात मार्च / एप्रिल, २०१३ अखेर आयोजित विद्यापीठीय विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र स्नातकांना विद्यावाचस्पती, पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात / सेवेत / श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणेबाबत पुनश्चः विचारार्थ.**

(टिपणी**:** शा.नि.संकीर्ण-२०१०/(३१२/१०)/विशि-०१ दि.१० मे, २०१० अन्वये, अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी असलेली प्रमाण संहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ रद्द करुन, त्याऐवजी सामायिक परिनियम (Common Statues) लागू होईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूद लागू करण्यात आलेल्या आहेत.

प्रमाण संहिता नियम १९८४ मध्ये शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नती बाबतच्या स्पष्ट तरतूदी नमूद होत्या. परंतु महाराष्ट्र नागरी सेवा नियमामध्ये पदोन्नतीसाठीच्या किमान सेवेची तरतूद नमूद नाही.

प्रमाण संहिता नियम १९८४ मध्ये वरीष्ठ पदावर पदोन्नतीसाठी विद्यापीठातील गट क (वर्ग -३) मधून गट ब (वर्ग -२) पर्यंतच्या कर्मचाऱ्यांना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेची तर गट ब (वर्ग २) मधून अ (वर्ग-१) पर्यतच्या कर्मचाऱ्यांना निकटतम निम्न पदावर नियमित पाच वर्षाच्या किमान सेवेची अट लागू होती.

सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२००५/प्र.क्र. १/२००५/प्र.क्र.१/२००५/१२ दि.२५ फेब्रुवारी, २००५ अन्वये, गट "**क**" (वर्ग-३) पासून गट "**अ**" (वर्ग-१) मधील सर्व टप्प्यार्यंतच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून राहील, असे शासनाने या परिपत्रकान्वये आदेश निर्देशित केलेले आहेत.

वरील शासन निर्णय अनुषंगाने, दि.२१ जुलै, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेत यापूर्वी विषय ठेवण्यात आलेला होता परंतु, ठराव क्र. ८ नुसार सदरचा विषय अमान्य करण्यात आला. शासन निर्णयातील तरतूदी आणि व्यवस्थापन परिषदेचा निर्णय परस्पराशी विसंगत होत आहेत.

व्यवस्थापन परिषदेच्या पुनर्विचारार्थ सादर).

**ठराव : कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात / सेवेत / श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणाऱ्या दि.२५/०२/२००५ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येवून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यासदेखील सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७६ (२) (ङ) अन्वये विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलातील प्राध्यापक पदाच्या निवड समितीवर नामिकेतील तज्ञांच्या नावाची शिफारस विद्यापरिषदेच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर.**

(टिपणी: विद्यापीठाने रसायनशास्त्र संकुल, संगणकशास्त्र संकुल व पदार्थविज्ञान संकुल इत्यादी संकुलातील रिक्त शिक्षक पदे भरण्यासाठी जाहिरात क्र.SUS/Esst/TP/०९/२०१३, दि.२७/०२/१३ रोजी जाहिरात प्रसिध्द केलेली होती. त्या अनुषंगाने प्राध्यापक पद भरण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७६ (२) (ङ) मधील तरतूदीनुसार विद्यापरिषदेकडे विषय सादर करण्यात आला होता.

दि.०७ नोव्हेंबर, २०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.१४४ नुसार, "विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलातील प्राध्यापकांच्या निवड समितीवर तज्ञांचे नामनिर्देशन करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७६ (२) (ङ) अन्वये तज्ञांच्या यादीस मान्यता देण्यात येवून यात अधिकच्या नावांचा समावेश करण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्याचा ठराव करण्यात येवून तशी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

उक्तप्रमाणे विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७६ (२) (ङ) अन्वये विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलातील प्राध्यापक पदाच्या निवड समितीवर नामिकेतील तज्ञांच्या नावासंदर्भात विद्यापरिषदेची शिफारस सर्वानुमते स्विकारण्यात येवून या संदर्भातील पुढील कार्यवाहीचे अधिकार मा.कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.**

**[ १४ ] अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीमध्ये बदल करण्याबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: दिनांक २६/०३/२०१३ रोजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता देताना अभियांत्रिकी विद्याशाखेतील बैठकीतील ठराव क्र. १८(४) Condition for recognition of PG Teacher and Guide for Ph.D. आणि ठराव क्र. १८(५) Criteria for guiding Dissertation work for Post Graduation पारित केलेले आहे. त्याअनुषंगाने सदरील दुरुस्त नियमावली दिनांक ११/६/२०१३ रोजी झालेल्या विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाच्या अभियांत्रिकी या विद्याशाखेच्या बैठकीमध्ये ठराव खालीलप्रमाणे झाला आहे.

"अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतच्या शिफारशी विद्यापरिषदेस करण्यात आली. त्याअनुषंगाने अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीमध्ये बदल करण्याबाबतचा विषय दि.७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, **विद्यापरिषदेने ठराव क्र. १५३ अन्वये अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीमध्ये बदल करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.**

सबब, पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता देताना वरील ठरावाप्रमाणे सदरच्या नियमावलीमध्ये दुरुस्ती करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव : अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर शिक्षक मान्यता व पीएच.डी. मार्गदर्शक नियमावलीमध्ये बदल करण्याबाबत विद्या परिषदेने केलेली शिफारस अमान्य करण्यात येवून सदरचा विषय विद्यापरिषेकडे पुनर्विचारार्थ पाठवावा असे सर्वानुमते ठरले.**

**[ १५ ] संशोधन सुविधा केंद्र व संशोधन सुविधा ठिकाण याबाबत तयार केलेली सुधारीत नियमावली विचारार्थ.**

(टिपणी: संशोधन सुविधा केंद्र व संशोधन सुविधा ठिकाण सुरु करण्याबाबतची सुधारीत नियमावली तयार करण्याकामी दिनांक २० एप्रिल, २०१३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठराव क्र.६९ नुसार मा.कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती.

| | |
|---|---|
| १) डॉ. कदम एस.डी. (अध्यक्ष) | २) डॉ. हलकुडे एस.ए. |
| ३) डॉ. निंबाळकर व्ही.एच. | ४) डॉ. कुष्णमूर्ती एम. |
| ५) डॉ. शिंदे एस.व्ही. | ६) डॉ. भिलेगावकर एस.डी. |
| ७) डॉ. पवार एम.एस. | ८) डॉ. कदम डी.जी. |
| ९) डॉ. पवार एन.बी. | १०) डॉ. श्रीमती रंगरेज ए.एम. |
| ११) डॉ. घुटे व्ही.बी. | १२) डॉ. अशोककुमार ई.एन. |
| १३) डॉ. राव यु.एम. | १४) डॉ. येळेगावकर एस.डी. |
| १५) डॉ. शेख ए.ए. | १६) डॉ. उबाळे व्ही.पी. |
| १७) डॉ. इंगोले जे.जे. | १८) डॉ. दलाल एम.एम. |
| १९) डॉ. घाडगे ए.एस. | २०) डॉ. कलशेटटी एम.एस. |

संशोधन सुविधा केंद्र/सुविधा ठिकाणाची सुधारीत नियमावली तयार करण्यासाठी उपरोक्त समितीची दिनांक २९/०७/२०१३ व १४/०८/२०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये नियमावली तयार करण्यात आली असून ती सोबत जोडण्यात आली आहे.

सबब, समितीने तयार केलेली संशोधन सुविधा केंद्र व संशोधन सुविधा ठिकाण बाबतच्या नियमावली दि.७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, **विद्यापरिषदेने ठराव क्र. १५२ अन्वये समितीने तयार केलेली संशोधन सुविधा केंद्र व संशोधन सुविधा ठिकाणबाबतची नियमावली व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्याबाबत केलेली शिफारस विचारार्थ सादर).**

**ठराव : संशोधन सुविधा केंद्र व संशोधन सुविधा ठिकाण याबाबत तयार केलेल्या सुधारीत नियमावलीबाबत विद्या परिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६ ] विभागीय संशोधन शिष्यवृत्ती याबाबत तयार केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ संकुलात कार्यरत असलेल्या मार्गदर्शकाकडे कार्यरत असणाऱ्या विद्यार्थ्यांना (DRF) देत नसल्यामुळे संशोधन करण्यास काही अडचणी होत होत्या. त्यासंदर्भात दिनांक ९ जुलै, २०१३ रोजी झालेल्या सर्व फॅकल्टीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

**Resolution No.6 :**
**It was resolved that, on basis of Shivaji University, Kolhpur to institute a Departmental Research Fellowship (DRF) for teach academic schools. Process of the same be initiated by the office (PGBUTR).**

सबब, उपरोक्तप्रमाणे Department Research Fellowship (DRF) साठी नियमावली सद्यपरीस्थितीमध्ये अस्तित्वात नसल्यामुळे सदरची नियमावली तयार करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे समिती गठित केली होती.

१) डॉ. सुर्यवशी एस.एस. (अध्यक्ष)

२) डॉ. महाडीक एस.बी.

३) डॉ. भोसले आर.बी.

त्याअनुषंगाने उपरोक्त समितीने दिनांक ०७/०९/२०१३ रोजी बैठकीमध्ये नियमावली तयार करण्यात आली आहे. तरी सदर नियमावलीबाबतचा विषय दि.७/११/२०१३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता, **विद्यापरिषदेने ठराव क्र. १५१ अन्वये विभागीय संशोधन शिष्यवृत्ती याबाबत तयार केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्याबाबत केलेली शिफारस विचारार्थ सादर).**

**ठराव : विभागीय संशोधन शिष्यवृत्तीबाबत तयार केलेल्या नियमावलीस विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १७ ] कला व ललित कला विद्याशाखा, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा, वाणिज्य विद्याशाखा, शिक्षशास्त्र विद्याशाखा आणि विधी विद्याशाखांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या Class Improvement च्या नियमावली संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः सर्व विद्याशाखेच्या अधिष्ठातांची बैठक दि.०५/०९/२०१३ रोजी विद्यापीठात झाली होती. सदरच्या बैठकीत कला व ललित कला विद्याशाखा, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा, वाणिज्य विद्याशाखा, शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि विधी विद्याशाखांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमांना Class Improvement ची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तयार केलेली नियमावली दि.०७ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र.१५९ अन्वये, विचारार्थ ठेवण्यात आला असता विद्यापरिषदेने Class Improvement च्या नियमावलीस व्यवस्थापन परिषदेकडे मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब, Class Improvement च्या नियमावली संदर्भात विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव : कला व ललित कला विद्याशाखा, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा, वाणिज्य विद्याशाखा, शिक्षशास्त्र विद्याशाखा आणि विधी विद्याशाखांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या Class Improvement च्या नियमावलीस विद्यापरिषदेने केलेली शिफारस अमान्य करण्यात आली व सदरचा विषय विद्यापरिषेकडे पुनर्विचारार्थ पाठवावा असे सर्वानुमते ठरले.**

**[ १८ ]  दि.१८/११/२०१३ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी: बांधकाम समितीची बैठक दि.१८/११/२०१३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. परिनियम ३३९ (f) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

३३९ (f) After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Buildings and Works Committee shall be placed before the Management Council for its approval.

त्यानुसार दि.१८/११/२०१३ रोजीच्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील ठराव क्र. २, ३ व ७ विचारार्थ).

**ठराव :  दि.१८/११/२०१३ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील विषय क्र. २ मधील Architect च्या यादीतील अ.क्र.१३ वगळून यादीतील इतर सर्व नावांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली व विषय क्र. ३ व ७ बाबत बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः**

**[ १९(१) ]** **सोलापूर विद्यापीठामध्ये बी.ए. भाग ३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास द्यावयाच्या "डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीमध्ये डॉ. येळेगांवकर यांनी दुरुस्ती करण्याबाबत केलेली विनंती विचारार्थ.**

(टिपणी: डॉ. श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर यांनी त्यांच्या दि.१०/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये, सोलापूर विद्यापीठामध्ये बी.ए. भाग ३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास "डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" देण्याकरिता रु. १,००,०००/- देणगी स्विकारण्याबाबत केलेली विनंती स्विकारुन "डॉ. श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" यास व्यवस्थापन परिषदेच्या दि.२६/०६/२०१३ रोजीच्या बैठकीत विषय क्रं.८ अन्वये, मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर देणगीच्या व्याजातून बी.ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास "डॉ. श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" देण्याकरिता डॉ. लोणीकर एस.व्ही. व ॲड. सलगर बी. एस. यांनी तयार केलेल्या नियमावलीचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या दि.१९/१०/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्रं.४ अन्वये सादर केला असता, व्यवस्थापन परिषदेने या नियमावलीस मान्यता दिली आहे.

तथापि, डॉ. येळेगांवकर यांनी "बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास " या ऐवजी "बी.ए. भाग - १, २, व ३ मध्ये राज्यशास्त्र हा विषय घेवून बी.ए. पदवी परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास" अशी दुरुस्ती करावी अशी दि.१८/११/२०१३ च्या पत्राव्दारे विनंती केली आहे. त्यामुळे सदरच्या नियमावलीत या अनुषंगाने दुरुस्ती करावी लागणार आहे.

सबब, "डॉ. श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" नियमावलीमध्ये दुरुस्ती करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठामध्ये बी.ए. भाग ३ राज्यशास्त्र या विषयाच्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास द्यावयाच्या "डॉ.श्रीकांत दत्तात्रय येळेगांवकर सुवर्णपदक" याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीमध्ये "बी.ए. भाग - १, २ व ३ मध्ये राज्यशास्त्र हा विषय घेवून बी.ए. पदवी परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास" अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |